या समवेत:- सोमवार दिनांक-०९/०९/२०२४ रोजी सकाळी/ १०.०० वा. प्राप्त झालेल्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या,स्थायी समिती सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

---

अहमदनगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-१/परिषद/स्थायी सभा/४८२/२०२४
अहमदनगर, दिनांक- १९ /०९/२०२४

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर
२. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,अहमदनगर
४. खाते प्रमुख सर्व

२/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील स्थायी समिती सभेस अनुपालन सादर करता येईल.

स्वाक्षरीत/-
(राहुल शेळके)
सचिव,स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद,अहमदनगर.

स्थायी समिती सभा सोमवार दिनांक ०९/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. सभेचे कार्यवृत्त

*हजर अधिकारी*

| *अ.क्र.* | *नाव* | *अ.क्र* | *नाव* |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री आशिष येरेकर<br>प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | २ | मा.श्री.संभाजी लांगोरे<br>अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | श्री.राहुल शेळके सचिव स्थायी समिती<br>तथा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | ४ | श्री.शैलेश मोरे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५ | श्री दादाभाऊ गुंजाळ<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) | ६ | श्री.समर्थ शेवाळे<br>प्रकल्प संचालक जलजीवन मिशन |
| ७ | श्री मनोज ससे<br>जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) | ८ | श्री.पी.बी. ध्रुपद<br>प्रभारी कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण) |
| ९ | श्री.संजय शेवाळे<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर) | १० | श्री.दिलीप सोनकुसळे<br>प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) |
| ११ | श्री.पाडुरंग गायसमुद्रे<br>जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा) | १२ | श्री.एच.बी.चव्हाण<br>कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.) |
| १३ | श्री निलेश कानवडे<br>कृषि विकास अधिकारी | १४ | डॉ.श्री दशरथ दिघे<br>जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी |
| १५ | डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे<br>जिल्हा आरोग्य अधिकारी | १६ | श्री.भास्कर पाटील<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) |
| १७ | श्री.अशोक कडूस<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | १८ | श्री देविदास कोकाटे<br>जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| १९ | श्री राजु लाकुडझोडे<br>उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी | २० | श्री. निखिल पठारे<br>प्र.उप अभियंता (भु.स.वि.यो.) |
| **२१** | श्री बाळासाहेब बुगे<br>शिक्षणाधिकारी (योजना) | | |

<u>विषय क्रमांक १:-</u> दि. १३/०८/२०२४ रोजीची स्थायी सभा पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे .

*ठराव क्र९६ :-* दि.१३/०८/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा.पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत कायम करणे व संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावर महत्वाचे कार्यवाहीच्या मुद्यावर संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत आली.संबंधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

विषय क्रंमाक २:-जिल्हा परिषदेचे स्वःउत्पनाचे सन २०२४-२५ मुळ अंदाजपत्रकातील जि.प. सांकेतांक क्रमांक

२०९१४ अंतर्गत ग्रामपंचायतींना शवदाहिनी देणे १०० टक्के अनुदानावर / ग्रामपंचायत दुरुस्ती व सुशोभिकरण करणे योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना शवदाहिनी पुरविणे कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

प्रस्तावना-: जिल्हा परिषदेचे स्व:उत्पनाचे सन २०२४-२५ मुळ अंदाजपत्रकातील जि.प. सांकेतांक क्रमांक २०९१४ अंतर्गत ग्रामपंचायतींना शवदाहिनी देणे १०० टक्के अनुदानावर / ग्रामपंचायत दुरुस्ती व सुशोभिकरण करणे योजनेंतर्गत खालील नमुद कामास प्रशासकीय मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

| अक्र. | कामाचे नांव | रक्कम (रु(लाखात. |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतींना शवदाहिनी पुरविणे | ४०.०० |

नियमातील तरतूद-: महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५, १२६, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ४ मधील परिशिष्ट २ तसेच शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दि:- ०७ ऑक्टोबर २०१७ नुसार ३०,००,००१ ते ५०,००,००० पर्यंत रक्कमेच्या कामांस प्रशासकीय मान्यता देणेस मास्थायी. समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील राजपत्र दि:-१३/०९/२०२२ नुसार जिल्हा परिषद अहमदनगरचा कार्यकाल दि:- २०/०३/२०२२ रोजी संपुष्टात येत असल्याने जिल्हा परिषदचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती पदे एकाच वेळी रिक्त झाली आहेत. त्यामुळे अहमदनगर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहमदनगर जिल्हा परिषदच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यांची सर्व कर्तव्य पार पाडण्यासाठी जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती यांची पदे निवडणुकीव्दारे भरले जातील तोपर्यंत प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

विभागाचे अभिप्राय-: जिल्हा परिषदेचे स्व:उत्पनाचे सन २०२४-२५ मुळ अंदाजपत्रकातील जि.प. सांकेतांक क्रमांक २०९१४ अंतर्गत ग्रामपंचायतींना शवदाहिनी देणे १०० टक्के अनुदानावर / ग्रामपंचायत दुरुस्ती व सुशोभिकरण करणे योजनेंतर्गत रक्कम रु.४०.०० लक्ष इतका नियतव्यय मंजुर आहे.

**ठराव क्र ९७:-**जिल्हा परिषदेचे स्व:उत्पनाचे सन २०२४-२०२५ मुळ अंदाजपत्रकातील जि.प. सांकेतांक क्रमांक २०९१४ अंतर्गत ग्रामपंचायतींना शवदाहिनी देणे १०० टक्के अनुदानावर / ग्रामपंचायत दुरुस्ती व सुशोभिकरण करणे योजनेंतर्गत रक्कम रु.४०.०० लक्ष इतका नियतव्यय मंजुर आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५, १२६, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ४ मधील परिशिष्ट २ तसेच शासन निर्णय क्रमांक : झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दि:- ०७ ऑक्टोबर २०१७ नुसार सदर योजनेंतर्गत खालील नमुद कामास या ठरावाव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अक्र. | कामाचे नांव | रक्कम रु (लाखात. |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतींना शवदाहिनी पुरविणे | ४०.०० |

विषय क्रंमाक ३:- ग्रामपंचायत मौजे आर्वी - अनगरे, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर चे विभाजन करुन आर्वी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे बाबत.

प्रस्तावना :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचे कार्यालयाकडुन मौजे आर्वी - अनगरे, ता.श्रीगोंदा चे विभाजन करुन मौजे आर्वी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापना करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी

केली असता दिनांक शासन निर्णय १२ फेब्रुवारी २००४ व २ सप्टेंबर २००६ नुसार आर्वी - अनगरे हे महसुली गावे आहेत. सन २०११ च्या लोकसंख्येनुसार आर्वी गावाची १२५१ व अनगरे गावाची १०२४ एवढी लोकसंख्या असुन आर्वी ग्रुप अनगरे गावाचे दरडोई उत्पन्न ६९.७०/- इतके असुन आर्वी गावाचे दरडोई उत्पन्न ६३.३७ इतके आहे. सदर विभाजनाबाबतचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेमार्फत शासनास स्थायी समितीचे ठरावासह सादर करावयाचा आहे.

नियमातील तरतुद :- शासनाकडील पत्र क्रं. .व्हीपीएम/२६०३/प्र.क्र.४२१५/पंरा-४(२२) दि०२/०९/२००६ मध्ये नमुद केलेनुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ४, तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय दि.१२ फेब्रुवारी २००४ नुसार प्रस्तावासोबत विदयमान स्थायी समितीचा ठराव जोडणे आवश्यक आहे. परंतु महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबन पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ११ मार्च २०२२ अन्वये जिल्हा परिषद अहमदनगर मध्ये मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, विषय समित्यांचे मा.सभापती सर्व यांचा कार्यकाल समाप्त झाल्याने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद अहमदनगर यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

विभागाचे अभिप्राय:- वरीलप्रमाणे ग्रामपंचायत आर्वी - अनगरे चे विभाजन करुन आर्वी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचे शिफारशीसाठी सादर करणेत येत असुन मान्यता मिळणेस विनंती आहे.

## **ठराव क्रमांक ९८:-** नियमातील तरतुदी (संदर्भ)

१. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ४,
२. ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक १२ फेब्रुवारी २००४.
३. महाराष्ट्र शासन राजपत्र,असाधारण भाग एक अ-मध्य उप-विभाग,ग्रामविकास विभाग,बांधकाम भवन,२५,मर्झबन पथ,फोर्ट,मुंबई ४००००१, दिनांक ११ मार्च २०२२
४. ग्रामस्थ मौजे आर्वी,ता.श्रीगोंदा यांचे मागणी पत्र.
५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा यांचेकडील प्रस्ताव दिनांक २६/०७/२०२४.

संदर्भ क्र. १ व संदर्भ २ मधील (इ) एखाद्या जिल्हा परिषदेच्या ठिकाणी, स्थायी समिती अस्तीत्वात नसल्यास, प्रशासकाने केलेला ठराव ग्राह्य धरण्यात येईल अशी तरतुद आहे. उक्त संदर्भ क्र. ३ अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांची प्रशासक म्हणून नेमणुक करण्यात आली आहे. तसेच संदर्भ ४ अन्वये मौजे आर्वी, ता.श्रीगोंदा येथील ग्रामस्थांच्या मागणी पत्रासह ग्रामपंचायतीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचे कार्यालयास प्रस्ताव सादर केल्याने संदर्भ क्र. ०५ अन्वये, गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांनी दिनांक २६/०७/२०२४ रोजी या कार्यालयास ग्रामपंचायत मौजे आर्वी - अनगरे चे विभाजन करुन आर्वी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापना करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

वरिल तरतुदींचे अवलोकन करता, ग्रामपंचायत मौजे आर्वी - अनगरे चे विभाजन करुन आर्वी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापना करणेस शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रंमाक ४:- ग्रामपंचायत अळकुटी ता. पारनेर येथे शॉपिंग बांधण्यासाठी जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज मिळणेबाबत.

गट विकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचेकडील पत्र क्र.ग्रापं-२/६५५/२०२४ दिनांक ०८/०८/२०२४ अन्वये प्रस्ताव सादर केलेले आहे. सदर प्रस्तावात ग्रामपंचायत अळकुटी ता. पारनेर येथे शॉपिंग सेंटर बांधकाम करण्यासाठी जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज रु. ५०,००,०००/- ची मागणी केलेली आहे.

ग्रामपंचायत अळकुटी ता. पारनेर यांची मासिक सभा दिनांक ३०/०१/२०२४ ठराव क्र. ८ अन्वये तसेच पंचायत समिती पारनेर सर्वसाधारण सभा दिनांक ०९/०७/२०२४ ठराव क्रं. ४० अन्वये तसेच ग्रामसभा ठराव क्र. ९/२ दि. ०२/०२/२०२४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८०,००,०००/- इतके आहे.

ग्रामपंचायत अळकुटी ता. पारनेर यांची मागील तीन वर्षाच्या आर्थिक स्थितीची तपासणी केली असता व गट विकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचे शिफारशीची तपासणी केली असता उत्पन्न व खर्चाचा तपशील अनुसरुन शासन निर्णय व्हीपीए/११५९/पीपीएच/६०दि.२३/०१/१९६० अन्वये अंदाजपत्रकाचे ७५ टक्के रक्कम देता येईल व तसेच शासन निर्णय जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६०(१ ली सुधारणा) २००० दिनांक २५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये उत्पन्नाच्या तीन वर्षांच्या सरासरीचे ३० पट (उत्पादक बाबींसाठी) ग्रामपंचायतीचे परत फेडीचे ऐपत लक्षात घेता रक्कम रु. ३४,७२,०००/- इतके रक्कम कर्ज खालील अटी व शर्तीवर देता येईल.

१. ज्या कामासाठी कर्ज दिलेले आहे त्या कामासाठी वापर करणेत यावे.
२. कर्जाची परत फेड १० वर्षांत परतफेड करण्यात यावे.
३. सदर कर्जावर व्याज प्रति वर्ष ५ टक्के व दिलेल्या मुदतीत न भरल्यास दंडात्मक व्याज २.५ टक्के अकारण्यात येईल.
४. बांधकाम स्वत:च्या मालकी हक्काचे जागेवरचं करण्यात यावे.
   ग्रामपंचायतीकडील विहीत जागेवर बांधकाम करावयाचे असल्यास सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यता घेवून बांधकाम सुरु करावे.

५. बांधकाम सुरु करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण (उदा.रस्ते, वीज) यांचा नाहरकत दाखला घ्यावा.

नियमातील तरतुदी -

१. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी नियम विपीए/११५९/पीपीएच/६० दिनांक २३/१/१९६० अनुसार ७५ टक्के रक्कम देता येईल.

२. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (१ली सुधारणा) २००० दि.२५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये.
३. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (१ली सुधारणा) २००० दि.२५/८/२००० नियम ११(२) (क) व (ड)

**ठराव क्रमांक९९:-** ग्रामपंचायत अळकुटी ता.पारनेर येथे शॉपिंग सेंटर बांधण्यासाठी जिल्हा ग्रामविकास निधीतून कर्ज रु. ५०,००,०००/- ची मागणी केलेली आहे. शासन निर्णय व्हीपीए/११५९/पीपीएच/६०दि. २३/०१/१९६० अन्वये अंदाजपत्रकाचे ७५ टक्के रक्कम देता येईल व तसेच शासन निर्णय जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६०(१ ली सुधारणा) २००० दिनांक २५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये

उत्पन्नाच्या तीन वर्षांच्या सरासरीचे ३० पट (उत्पादक बाबींसाठी) ग्रामपंचायतीचे परत फेडीचे ऐपत लक्षात घेता रक्कम रु. ३४,७२,०००/- इतके रक्कम कर्ज खालील अटी व शर्तीवर देता येईल.
ज्या कामासाठी कर्ज दिलेले आहे त्या कामासाठी वापर करणेत यावे.
कर्जाची परत फेड १० वर्षांत परतफेड करण्यात यावे.
सदर कर्जावर व्याज प्रति वर्ष ५ टक्के व दिलेल्या मुदतीत न भरल्यास दंडात्मक व्याज २.५ टक्के आकारण्यात येईल.
बांधकाम स्वत:च्या मालकी हक्काचे जागेवरचं करण्यात यावे.
ग्रामपंचायतीकडील विहीत जागेवर बांधकाम करावयाचे असल्यास सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यता घेवून बांधकाम सुरु करावे.
बांधकाम सुरु करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण (उदा.रस्ते, वीज) यांचा नाहरकत दाखला घ्यावा.

**विषय क्रमांक ५:-** कृषि विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर मार्फत जिल्हा परिषद सेस फंड सन २०२४-२५ मधून राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या जिल्हा परिषद स्तरावरुन डी.बी.टी.अंमलबजावणीसाठी मंजुरी मिळणे.

नियमाची तरतुद :- साप्रवि१/परिषद/३३४/२०२२ दिनांक २८/३/२०२२ अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील विविध विकासकामे व योजना अंमलबजावणीसाठी निर्णय घेणेकामी विविध स्तरावर सल्लागार समित्यांची नियुक्ती केली असल्याने, स्थायी समिती सभेचे अनुषंगाने सल्लागार समितीची रचना केलेली आहे. त्यामुळे सदर समितीचे अध्यक्ष मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर हे असल्याने, मा.स्थायी सल्लागार समिती सभेमध्ये विषय मंजुरीस्तव सादर करणेत येत आहे.

विभागाचे अभिप्राय :- मा.महाराष्ट्र शासनाचे नियोजन विभागाकडील शासन निर्णय क्रं.डिसीटी २३१६/प्र.क्रं.१३३/का.१४१७ दिनांक ०५ डिसेंबर २०१६ अन्वये विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळणा-या लाभांचे हस्तांतरण, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणेबाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने विविध योजनेंचा लाभ झेडपीपीएफएमएस व्दारे तालुकास्तरावर वित्तप्रेषणाव्दारे व तालुकास्तरावरुन लाभार्थ्यांना डीबीटीव्दारे लाभ मिळत आहे. यामुळे अखर्चित रक्कमेंचा भरणा तालुकास्तरावरुन जिल्हास्तरावर करणेस विलंब होत आहे.

परंतु, मा.विभागीय आयुक्त यांचे सुचनेनुसार तसेच वेळोवेळी खातेप्रमुखांच्या होणा-या आढावा सभेमध्ये विविध योजनेंचा लाभ तालुकास्तरावरुन न देता जिल्हा परिषद स्तरावरुन लाभार्थ्यांना डिबीटी व्दारे देण्यात यावा जेणेकरुन लाभार्थ्यांना देण्यात आलेला लाभ वेळेत त्यांचे बँक खाती वर्ग करता येईल, अशाप्रकाराच्या सुचना करणेत आलेल्या आहेत. यामुळे योजनेंच्या अखर्चित रक्कमा तालुकास्तरावर प्रलंबित राहणार नाहीत.कृषि विभाचे जि.प.सेस फंड सन २०२४-२५ मधून विविध वैयक्तिक योजनांचा लाभ लाभार्थींना डीबीटी व्दारे जिल्हा परिषद स्तरावरुन देण्याकामी मा.स्थायी सल्लागार समिती,जिल्हा परिषद, अहमदनगर यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**ठराव क्रमांक १००:-** १. ग्रामिण भागातील शेतक-यांना स्लरी फिल्टर उपकरण (५० टक्के किंवा रक्कम

रु.२०,०००/- मर्यादेपर्यंत ) अनुदानावर देणे. रक्कम रु.७.५० लक्ष

योजनेचे फायदे:-

१. या उपकरणाच्या माध्यमातून जीवामृत/गोबर गॅस स्लरी पुर्णपणे गाळून मिळते व त्याला ठिबक सिंचनामधून देता येते.

२. शेतीचे आरोग्य सुधारण्यासाठी अनेक शेतकरी सेंद्रिय शेतीकडे सध्या वळत आहेत. मात्र शेण स्लरी/जीवामृत हाताने संपुर्ण शेतात देणे खुप वेळ वाया घालवणारी तसेच शारीरीक कष्टाचे काम आहे. परंतु या उपकरणाच्या वापरामुळे वेळ वाया जाणे तसेच शारीरीक कष्ट करण्याची आवश्यकता भासत नाही.

३. यामुळे स्लरी देण्याच्या कामात लागणारी १०० टक्के मजुरी खर्च कमी होतो तसेच रासायनिक खतांच्या खर्चात मोठी बचत होते.

४. जीवामृत/गोबर गॅस स्लरी हे नैसर्गिक शेतीचे अविभाज्य अंग आहे. यापासुन पिकाला लागणारे विविध मुख्य अन्नद्रव्य (नत्र, स्फुरद, पालाश) दुय्यम अन्नद्रव्य (कॅल्शियम, मॅग्नेनियम,सल्फर) व सुक्ष्म अन्नद्रव्य (लोह,मॅगनीज,बोरॉन इ.) मिळतात. त्याचबरोबर जमिनीत गरजेचे असलेले अनेक बॅक्टेरिया जीवामृत/शेण स्लरी मधुन उपलब्ध होतात. याच्या परिणाम स्वरुप मातीचा पोत सुधारतो, आधिच उपलब्ध असलेल्या अन्नद्रव्यांचा संपुर्ण वापर होऊन गुणवत्ता सुधारते या उपकरणाच्या पध्दतीने वापर केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन शेतक-यांच्या उत्पन्न वाढवण्यात मदत हो**ते.**

स्लरी फिल्टर खरेदी करणा-या लाभार्थींची निवडीसाठी अटी व निकष :-

१.अल्प भुधारक/अत्यल्प भुधारक लाभार्थ्यांस प्राधान्य देण्यात येते.

२.लाभार्थी सुक्ष्मसिंचन, फळबागधारक असावा.

३.८ अ व ७/१२ उतारा आवश्यक आहे.

४.लाभार्थीकडे पशुधन असावे व त्यासाठी पशुधन पर्यवेक्षक यांचा दाखला आवश्यक राहील.

२.शेतक-यांना कडबाकुटटी मशिनसाठी किंमतीच्या ५० टक्के अर्थसहाय करणे.

(प्रति लाभार्थी अनुदान रु.९०००/- प्रमाणे) रक्कम रु.३०.०० लक्ष

योजनेचे फायदे :-

१.कडबाकुटटीमुळे पशुधनास चा-याची कुटटी तयार करुन खावू घातल्यास त्या चा-याचे पशुधनास चांगल्याप्रकारे रवंथ करता येते.

२.चा-याची कुटटी करुन मुरघास तयार करता येतो.

३.चा-याची बारिक कुटटी होत असल्याने चारा वाया न जाता चा-याची बचत होत असते.

४.चा-याच्या बारीक कुटटीमुळे जनावरांना रवंथ करणे सोयीचे होते त्यामुळे जनावरांच्या दुधउत्पादनामध्ये वाढ होते.

कडबाकुटटी खरेदी करणा-या लाभार्थींची निवडीसाठी अटी व निकष :-

१) संबंधीत शेतकरी लाभार्थ्यांने शेती असले बाबत पुरावे दाखल ८ अ व ७/१२ उतारा देणे बंधनकारक राहिल.
२) प्रस्तावा सोबत शेतक-यांकडे पशुधन असलेबाबतचा पशुधन पर्यवेक्षक/ पशुधन विकास अधिकारी यांचा दाखला आवश्यक आहे.
३) या योजनेचा लाभ जिल्हा परिषद कार्यक्षेत्रातील अल्प व अत्यल्प भुधारक, महिला, अपंग, शेतकरी लाभार्थी यांना गट निहाय उद्दिष्टा नुसार देण्यात यावा.

४) निवड केलेल्या शेतक-यांनी निश्चित केलेल्या तांत्रिक मापदंडानुसार जिल्हास्तरावर/ तालुकास्तरावर उपलब्ध असलेल्या अधिकृत विक्रेत्यांकडून/उत्पादकांकडून डीबीटी कार्यपध्दतीनुसार त्यांच्या पसंतीने मोटार विरहीत कडबाकुट्टी सयंत्र खरेदी करणे बंधनकारक राहिल.

| Technical Specification | |
|---|---|
| Description of Goods with details of Specification | |
| Name of Implement :- | Power operated Chaff cutter ३ HP W/O Electric Motor (R/F model) |
| Testing Institute :- | FMT&TIs/Dangerous machinery Act,१९८३ (IS:९०२०) |
| Testing Standards :§ | IS:१५११:२००० IS:७८९७:१९९६ IS:११४५९:१९८५ |
| Weight & other Specification :- | ३HP motor, १४४० rpm, Wt ११०.०० to २०७.०० kg without prime mover, Wt १०२.०० to २३१.०० kg with prime mover Safety Guard Provided |

५) वरिल तांत्रिक मापदंडा प्रमाणे पुर्णदराने खरेदी केलेल्या मोटार विरहीत कडबाकुट्टी सयंत्राच्या किंमतीच्या ५० टक्के अथवा रक्कम रु.९०००/- यापेक्षा कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहिल.

६) कडबाकुट्टी सयंत्रासाठी आवश्यक असणारी इले.मोटार लाभार्थींनी स्वत:कडील वापरावी अथवा स्वखर्चाने खरेदी करावी त्यास अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

३.मधाचे गांव विकसित करणे. (रक्कम रु.१०.०० लक्ष)

योजनेचे फायदे :- राज्यातील सर्व घटकातील लाभार्थींना मधमाशा पालन व्यवसायातून उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करुन त्यांचे जीवनमान उंचावणे आणि मध उदयोगाचा विकास करणे यासाठी पायाभूत सुविधा निर्मिती करणे, त्यांचा दर्जा वाढविणे इ.बाबींची आवश्यकता लक्षात घेऊन जिल्हयातील मध उदयोग विकासासाठी असणारे पोषक वातावरण लक्षात घेता व्यावसायिक तत्वावर मध उदयोगाचा व्यवसाय करणारे मधपाळ निर्माण करणे हे या योजनेचे मुख्य फायदे आहेत.

मधपाळ लाभार्थींच्या निवडीसाठी अटी व निकष खालिलप्रमाणे आहेत.

१.अर्जदार साक्षर असावा.

२.स्वत:ची शेती असल्यास प्राधान्य

३.१८ वर्षापेक्षा जास्त वय

४.अर्जदाराने मंडळाचे मान्यता प्राप्त प्रशिक्षण केंद्रात १० दिवसांचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे.

योजनेची अंमलबजावणी:-

जिल्हा परिषद सेस फंड २०२४-२५ अंतर्गत, 'मधाचे गांव' विकसित करणे, या योजनेसाठी रक्कम रु.१०.०० लक्ष ची तरतुद करण्यात आलेली असल्याने, तसेच १० सातेरी सागवानी मधपेटयांचे साहित्य अशा एक युनिटची रक्कम रु.९६,२८१/- असल्याने, ५० टक्के अनुदान जिल्हा ग्रामोदयोग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग मंडळ, अहमदनगर यांचेकडून लाभार्थ्यांस मिळणार असुन जि.प.सेस फंड मधील मधाचे गांव विकसित करणे, या योजनेतून लाभार्थ्यांचा ५० टक्के लाभार्थी हिस्सा प्रमाणे रक्कम रु.४८,१४१/- रुपये हे जिल्हा ग्रामोदयोग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग मंडळ, अहमदनगर यांचेकडेस भरणा केल्यास, एकुण रक्कम रु.९,६२,८२०/- इतक्या रक्कमेची आवश्यकता भासणार असुन या रक्कमेमध्ये मधपाळ लाभार्थींच्या निवडीसाठी अटी व निकष पुर्ण करणारे एकुण २० लाभार्थ्यांना लाभ देण्यात येणार आहे.

४.नविन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत उभारणी केलेल्या बायोगॅस सयंत्रासाठी प्रोत्साहनपर अनुदान देणे. (प्रति लाभार्थी अनुदान रक्कम रु ४९६०/-) रक्कम रु.१२.५० लक्ष

योजनेचे फायदे :-
१.बायोगॅस घरगुती वापरासाठी प्रदुषण विरहीत इंधन म्हणून अंत्यंत उपयुक्त आहे.
२.प्रकाशासाठी विदयुत दिवा लावण्यासाठी देखील उपयुक्त आहे.
३.वृक्षतोड कमी होते, प्रदुषणाचा त्रास कमी होतो व पर्यायाने संवर्धन होते.
४.उत्तम प्रतीचे सेंद्रिय खत तयार होते. त्यामुळे रासायनिक खताची बचत व जमिनीचा पोत सुधारतो.
५.धुरामुळे होणारा त्रास टाळता येतो. त्यामुळे महिलांच्या आरोग्याची हानी टाळता येते.
६.इतर इंधनाची बचत होते, त्यामुळे खर्चात कपात होते.
लाभार्थीची निवडीसाठी अटी व निकष :-
१) biogas.mnre.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक. २)लाभार्थ्याचे नावावर ८ अ खाते उतारा असावा ३) आधारकार्ड झेरॉक्स ४)पशुधन असले बाबतचा दाखला.५) ग्रामसेवकाचा रहिवासी दाखला ६)संयंत्र बांधकामासाठी जागा उपलब्ध असावी. ७)आधारलिंक बँकपासबुकची छायांकित प्रत. ८)लाभार्थी जिल्हा परिषद कार्यक्षेत्रातील असावा.

५.आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाला शेती उपयोगी साहित्य खरेदी करण्याकामी अनुदान देणे (प्रति लाभार्थी रक्कम रु.५००००/-)
योजनेचे फायदे :- आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाला शेती उपयोगी साहित्य देऊन त्यांचे जिवनमान सुधारण्यास प्रोत्साहन देणे.

लाभार्थीची निवडीसाठी अटी व निकष :-
१) महसुल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय दि.२७ फेब्रुवारी २००६ अन्वये जिल्हास्तरीय गठीत केलेल्या समितीने शासकीय मदतीसाठी पात्र ठरविणेत आलेल्या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबास या योजनेअंर्तगत लाभ देण्यात यावा. २) सदर योजनेअंतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकरी पात्र कुटंूबास तालुकास्तरावरील कृषि अधिकारी/विस्तार अधिकारी, कृषि पंचायत समिती यांनी प्रत्यक्ष भेटीत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाकडून शेतीउपयोगी साहित्य मिळणेबाबत लेखी मागणीपत्र प्राप्त झाल्यावर उपलब्ध अनुदानाच्या अधिन राहून शेती उपयोगी साहित्य खरेदी करणेसाठी पंचायत समिती स्तरावरुन पुर्वसंमती देण्यात यावी.३) डीबीटी व्दारे नमुद कार्यपध्दतीनुसार शेतीउपयोगी साहित्य खरेदी करणे बंधनकारक राहील.४) खरेदी करण्यात आलेले शेतीउपयोगी साहित्य आयएसआय/बीआयएस मानकाप्रमाणे असणे बंधनकारक राहील.५) शेती उपयोगी साहित्य खरेदी बाबतीची अधिकृत देयक प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष मोका तपासणी करुन मंजूर अनुदान लाभार्थ्यांचे आधार संलग्न बँक खाती वर्ग करण्यात यावे.

वरिल १ ते ५ योजनांची अंमलबजावणी:-
१.मा.महाराष्ट्र शासनाचे नियोजन विभागाकडील शासन निर्णय क्रं.डिसीटी २३१६/प्र.क्रं.१३३/का.१४१७ दिनांक ०५ डिसेंबर २०१६ अन्वये विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळणा-या लाभांचे हस्तांतरण, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणेबाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने विविध योजनेंचा लाभ झेडपीपीएफएमएस व्दारे तालुकास्तरावर वित्तप्रेषणाव्दारे व तालुकास्तरावरुन लाभार्थ्यांना डीबीटीव्दारे लाभ मिळत आहे.

यामुळे अखर्चित रक्कमेंचा भरणा तालुकास्तरावरुन जिल्हास्तरावर करणेस विलंब होत आहे. परंतु, मा.विभागीय आयुक्त यांचे सुचनेनुसार तसेच वेळोवेळी खातेप्रमुखांच्या होणा-या आढावा सभेमध्ये विविध योजनेंचा लाभ तालुकास्तरावरुन न देता जिल्हा परिषद स्तरावरुन लाभार्थ्यांना डिबीटी व्दारे देण्यात यावा जेणेकरुन लाभार्थ्यांना देण्यात आलेला लाभ वेळेत त्यांचे बँक खाती वर्ग करता येईल, अशाप्रकाराच्या सुचना करणेत आलेल्या आहेत. यामुळे योजनेंच्या अखर्चित रक्कमा तालुकास्तरावर प्रलंबित राहणार नाहीत. कृषि विभागाचे जि.प.सेस फंड सन २०२४-२५ मधून विविध वैयक्तिक योजनांचा लाभ लाभार्थींना डीबीटी व्दारे जिल्हा परिषद स्तरावरुन देण्याकामी दिनांक ०९/०९/२०२४ रोजी होणा-या मा.स्थायी सल्लागार समिती, जिल्हा परिषद, अहमदनगर यांची मान्यता घेण्यात येत आहे.

२.सर्व योजनांच्या लाभार्थी निवड पंचायत समिती स्तरावरुन करण्यात येऊन त्या यादीस कृषि सल्लागार समितीची मान्यता घेण्यात यावी.

३.सर्व योजनांच्या लाभार्थी निवडीचे परिपुर्ण प्रस्ताव हे पंचायत समिती स्तरावरच राहतील.

४.खरेदी पावती, मोका तपासणी अहवालाची संपुर्ण अभिलेखे पंचायत समिती स्तरावर ठेवावेत.

५.लेखापरिक्षणासाठी योजनांचे अभिलेखे तालुकास्तरावरुन उपलब्ध करुन दयावेत.

वरिलप्रमाणे विषयांवर साधक बाधक चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

स्वाक्षरीत/-
सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहमदनगर

स्वाक्षरीत/-
प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर